हैं तय्यार हम...

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE
21km
17 Dec 2017
Associate Sponsor riso
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

यंग रनर ग्रुप... (डावीकडून) अविनाश कुलकर्णी, संजय पाटील, नितीन देशमुख, मधुकर जाधव, सचिन इंजे, भाऊसाहेब गवळी, किशोर देसले, दीपक पुराणी, साहेबराव खटाणे, विशाल पालोदकर, सुधीर कुलकर्णी, अरोरा, रितेश मानधनी, अभिषेक गौड, बालाजी नारगुडे, जयंत खरोटे.

प्रतीक मार्केटिंग ग्रुप... (डावीकडून) सागर सुलताने, कादर अली, गुरुज्योत दुमडा, लकी दुमडा (संचालक), सरबतसिंग सोडी, संदेश त्रिभुवन, फरीद खान.

ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

स्पर्धा
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

२७ दिवसांत ३१३ हेक्टर जमीन ताब्यात : ३७० कोटीचा दिला मावेजा

'समृद्धी महामार्ग' वेगात

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : समृद्धी महामार्गासाठी जिल्ह्यातील औरंगाबाद, गंगापूर, वैजापूर तालुक्यांतील सुमारे ३९३.९३ हेक्टर जमीन प्रशासनाने ताब्यात घेतली असून, त्यापोटी आतापर्यंत अंदाजे ३७० कोटी रुपयांचा मोबदला दिला आहे. ९८४ एकर जमीन प्रशासनाने संपादित केली आहे. मागील २७ दिवसांत ३१३ हेक्टर जमीन संपादित केली असून, आजवरच्या भूसंपादनाच्या सर्वाधिक गतिमान काळात हे २७ दिवस नोंदविले जाणार आहेत. ६८८ खरेदीखते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या नावाने करण्यात आली आहेत. ८७८ शेतकऱ्यांनी या महामार्गासाठी आतापर्यंत जमीन दिली आहे.

उपविभागीय अधिकारी शशिकांत हदगल यांनी सांगितले की,

सुटीच्या दिवशीही रजिस्ट्री सुरू आहेत. १,६०० हेक्टर जमीन संपादित करायची असून, त्यातील ४०० हेक्टरसाठी नोटिफिकेशन निघालेले नाही. १० ऑक्टोबरपर्यंत २० हेक्टरपर्यंत भूसंपादन झालेले होते. ३० ऑक्टोबरपर्यंत ६० हेक्टर भूसंपादन झालेले होते. १ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबरपर्यंत या २७ दिवसांत ३१३ हेक्टर जमिनीचे संपादन करण्यात आले आहे. रोज १० ते १२ हेक्टर भूसंपादन होण्याचे प्रमाण यातून पुढे येते. यावेळी अप्पर तहसीलदार रमेश मुंदलोड यांची उपस्थिती होती.

भूसंपादनाची सद्य:स्थिती

तालुका	खरेदी	शेतकरी	भूसंपादन
औरंगाबाद	३१३	४४२	७५६.९७ हेक्टर
गंगापूर	८८	१०६	७१.०७ हेक्टर
वैजापूर	२८७	३०३	१६५.८८ हेक्टर
एकूण	६८८	८७८	३९३.९३ हेक्टर

औरंगाबादेतून समृद्धी महामार्ग

समृद्धी महामागार्ची जिल्ह्यातील लांबी	११३.३० कि.मी.
मार्गाची रुंदी	१२० मीटर
येणारे तालुके	औरंगाबाद, वैजापूर, गंगापूर
गावांची संख्या	औरंगाबाद (३६), वैजापूर (१५), गंगापूर (११)
७/१२ गटांची संख्या	९६५
खातेदारांची संख्या	३,२३७
रस्त्यासाठी आवश्यक क्षेत्र	१६८४ हेक्टर आर.
शासकीय जमीन	४७ हेक्टर आर.
बाधित वनक्षेत्र	२६.८७ हेक्टर आर.

सर्वसामान्यांना धनवान बनविण्याचे सूत्र

मार्गदर्शन : अंकशास्त्र व शेअर बाजार यावर शीतल बाखरे यांचे मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : कमीत कमी गुंतवणुकीमध्ये जास्तीत जास्त फायदा मिळवणे शेअर मार्केटमध्ये सहज शक्य आहे. मात्र, त्यासाठी शेअर बाजाराविषयी काही मूलभूत माहिती आणि या क्षेत्रातील बारकाव्यांचा अभ्यास असणे आवश्यक ठरते. शेअर बाजाराचा अभ्यास करून योग्य पद्धतीने गुंतवणूक केली तर सर्वसामान्य ते धनवान म्हणजेच सामान्य ते असामान्य, असा प्रवास सहज शक्य आहे.

हा प्रवास कसा करायचा, याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी सखी मंच व प्रीव्हिलेज मंच यांच्या संयुक्त विद्यमाने मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, यादरम्यान शेअर बाजार विषयातील तज्ज्ञ शीतल बाखरे मार्गदर्शन करतील.

दि. २ डिसेंबर रोजी लोकमत हॉल, लोकमत भवन येथे सायं. ५:३० वा. हा कार्यक्रम होईल. डेली ट्रेडिंग, फ्युचर ट्रेडिंग, ऑप्शन ट्रेडिंग, इक्विटी ट्रेडिंग, पोर्टफोलियो मॅनेजमेंट, ऑनलाइन ट्रेडिंग याविषयी या सेमिनारमध्ये माहिती दिली जाणार आहे.

मेहनत करणे आपल्या हातात असले तरी मेहनतीला नशिबाची जोड मिळणेही तितकेच महत्त्वाचे ठरते. म्हणूनच अंकशास्त्राची महती अनेकांनी ओळखली आणि त्यानुसार आपल्या नावात बदल करून अपेक्षेपेक्षाही अधिक यश मिळविले.

या कार्यक्रमात बाखरे अंकशास्त्राविषयीही माहिती देणार आहेत. तेव्हा एकाच मंचावर दोन महत्त्वपूर्ण क्षेत्रांविषयी माहिती देणाऱ्या या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहा.

प्रीव्हिलेज मंच
पर्व नवे समृद्धीचे.. नव्या आनंदाचे !

लोकमत सखी मंच

कार्यक्रम विनामूल्य असून, प्रवेश सर्वांसाठी खुला आहे. प्रवेश मागील गेटने. अधिक माहितीसाठी १८५०४०६०१७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

१२ कोटींच्या निधीमध्ये नांदेडला आधी प्राधान्य

औरंगाबादला खो : विकासाची नुसती प्रतीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : देश-विदेशातील पर्यटकांना नजरेसमोर ठेवून दक्षिण मध्य रेल्वेतील नांदेड आणि औरंगाबाद रेल्वेस्टेशनच्या विकासासाठी सुमारे १२ कोटींचा निधी मिळणार आहे; परंतु या निधीमध्ये नांदेडला आधी प्राधान्य दिले जात आहे. औरंगाबाद रेल्वेस्टेशनला निधी मिळण्याची नुसती प्रतीक्षा करावी लागत आहे.

देशातील २४ रेल्वेस्टेशनसाठी रेल्वे आणि पर्यटन मंत्रालयाने २४० कोटी रुपये मंजूर केले आहेत. या २४ मध्ये नांदेड आणि औरंगाबाद रेल्वेस्टेशनचा समावेश आहे. या निधीतून प्रवाशांना सोयी-सुविधा देण्यासह जागतिक दर्जाचे रेल्वेस्टेशन बनविण्यावर भर देण्यात येत आहे. जवळपास १२ कोटींचा निधी दोन्ही रेल्वेस्टेशनला देण्यात येणार आहे. यामध्ये आतापर्यंत नांदेड रेल्वेस्टेशनला १ कोटीचा निधी मिळाला आहे; परंतु औरंगाबाद रेल्वेस्टेशनला निधी मिळण्यासाठी नुसतीच वाट बघावी लागत आहे. परिणामी, पर्यटनदृष्ट्या रेल्वेस्टेशनचा विकास करण्यास अडचणी येत आहेत. आगामी आर्थिक वर्षांत औरंगाबाद रेल्वेस्टेशनसाठी पैसे मिळण्यासाठी प्रयत्न केला जात आहेत, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

दुसऱ्या टप्प्याचीही प्रतीक्षा

मॉडेल रेल्वेस्टेशनच्या पहिल्या टप्प्यात नवीन इमारत उभारण्यात आली आहे, तर दुसऱ्या टप्प्यात जुन्या इमारतीचा विकास केला जाणार आहे; परंतु दोन वर्षांपासून या कामाची प्रतीक्षा केली जात आहे. निधीच्या प्रतीक्षेमुळे हे काम आणखी पुढे ढकलले गेले आहे.

बिरसा मुंडा यांचा आदर्श घ्या -निकम

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : आदिवासींच्या हक्कांसाठी व संरक्षणासाठी बिरसा मुंडा यांनी प्राणाची आहुती दिली. प्रत्येक आदिवासीने आपल्या हक्कांसाठी बिरसा मुंडा यांचा आदर्श घेतला पाहिजे, असे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्र. ज. निकम गुरुजी यांनी केले. आदिवासी ठाकूर जमातीच्या वतीने बिरसा मुंडा जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पी. टी. सुरडकर, जगन्नाथ चव्हाण, मंगेश निकम, रत्नमाला सुरडकर, आदींची उपस्थिती होती. रामेश्वर ठाकूर यांनी आभार मानले. संतोष निकम, राजेंद्र ठाकूर, भगवान संकपाळ, चंद्रकांत सोनवणे आदींनी परिश्रम घेतले.

आयकर विभागाचे अधिकारी सहभागी होणार

शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी महामॅरेथॉन आवश्यक

शिवदयाल श्रीवास्तव
प्रधान आयकर आयुक्त

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : लोकमतद्वारा महामॅरेथॉनचे १७ डिसेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम स्तुत्य आहे. कारण यामुळे शहरवासीयांना आपले शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी प्रोत्साहन मिळते. धावण्यामुळे शारीरिक क्षमता वाढतेच. शिवाय सहनशीलताही निर्माण होते. जीवनात सहनशीलता अत्यंत महत्त्वाची असते.

महामॅरेथॉन स्पर्धा घेणे का आवश्यक आहे?

स्पर्धेच्या युगात मनुष्याचा संपूर्ण जीवनक्रम बदलून गेला आहे. कामाच्या व्यापात आपल्या शरीराकडे जेवढे पाहिजे तेवढे लक्ष देण्यास मनुष्याला वेळ मिळत नाही. महामॅरेथॉनमुळे इतरांकडे बघून आपणही धावावे, अशी इच्छा प्रत्येकाच्या मनात येतेच. त्यासाठी दोन ते तीन महिने आधीपासून अनेक जण सकाळच्या वेळी धावण्यास, चालण्यास सुरुवात करतात. यातून आपल्या आरोग्याकडे सकारात्मक पाहण्याचा दृष्टिकोन निर्माण होतो. धावताना आपल्यातील कमजोरी लक्षात येते आणि पुढील शारीरिक धोके टाळण्यासाठी मग ती व्यक्ती आपल्या आरोग्याप्रती जागरूक होते. आपले आरोग्य व स्पर्धाप्रती सकारात्मक भाव निर्माण होतो यासाठी महामॅरेथॉन स्पर्धा घेणे आवश्यक आहे.

सामूहिक धावण्यातून कोणता उद्देश सफल होतो?

महामॅरेथॉनमध्ये हजारोच्या संख्येने लोक धावण्यात सहभागी होतात. यातून सामूहिक 'खेळभावना' निर्माण होते. सामाजिक एकोपा, एकता अशा उपक्रमातूनच निर्माण होते. खेळ भावनेतूनच व्यक्ती वैयक्तिक उत्कर्ष करते. त्याद्वारे समाजातील एक प्रभावशाली अंग बनत असते.

महामॅरेथॉनसारख्या स्पर्धेत मर्यादित अंतर काही वेळात पार करण्याचे उद्दिष्ट दिले जाते. यातून कमीत कमी वेळात 'लक्ष्य' साधण्याची प्रत्येकात जिद्द निर्माण होते. हीच उद्दिष्टपूर्तीची सवय दैनंदिन जीवनात, कामकाजात महत्त्वाची भूमिका बजाविते. हाच उद्देश सामूहिक धावण्यातून सफल होतो.

शहरवासीयांना आपण काय सल्ला द्याल?

मागील वर्षी लोकमतच्या महामॅरेथॉन स्पर्धेत आयकर विभागातील काही अधिकारी सहभागी झाले होते. यंदाही अधिकारी सहभागी होणार आहेत. शहरवासीयांनी महामॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे, एवढेच नव्हे तर ३ कि.मी. अंतराच्या 'फॅमिली रन' मध्येही सहपरिवाराने भाग घेऊन या महामॅरेथॉनचा एक भाग बनावे.

कठोर परिश्रम व निष्ठा तसेच शिस्त यास जीवनात प्राथमिकता देणे आवश्यक आहे. याचा जीवनात अवलंब केला तर या महान देशाचे एक चांगले, यशस्वी नागरिक म्हणून आपली ओळख निर्माण होऊ शकते.

घाटीमध्ये लाखोंचे उपकरण धूळखात

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : घाटीत एकीकडे निधीअभावी यंत्रांची देखभाल-दुरुस्ती रखडत आहे, तर दुसरीकडे सौंदर्योपचाराचे ५० लाखांचे उपकरण चार महिन्यांपासून धूळखात पडून असल्याचे समजते.

राज्यातील तीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत हे यंत्र देण्यात आले. मुरुम, मस आदींच्या उपचारांसाठी किमान खाजगी रुग्णालयांत १५०० ते २००० हजार रुपये मोजावे लागतात.

बॉलीवूडमध्ये स्कीन टायटनिंग केली जाते, याविषयी सर्वांनाच कुतूहल आहे. घाटीत प्राप्त झालेल्या या यंत्रावर हे उपचारही घेता येणार आहेत; परंतु एकीकडे यंत्र नाही म्हणून रुग्णांची परवड, तर दुसरीकडे यंत्र असूनही उपचार सुरू करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे समजते.

Govt Reg.No.7342
पेन केअर इंस्टीट्युट
ऑर्थोपेडीक सर्जन द्वारे सल्ला व उपचार

सांधेवात, गुडघेदुखी, मान, पाठ,कंबरदुखी मायग्रेन (डोकेदुखी), फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी) सायटीका, स्लिप डिस्क, टाचदुखी, टेनिस ऐल्बो हातापायात मुंग्या येणे
अपना बाजार, बाफना ज्वेलर्स समोर, जालना रोड, औरंगाबाद.
9822899660, 9422713387, 9767442040
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे)
सोमवार ते शुक्रवार फक्त

वेरुळला जाणाऱ्या पर्यटकांना मनस्ताप

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : एस. टी. महामंडळाच्या वातानुकूलित बससेवेने वेरुळला जाणाऱ्या पर्यटकांना सोमवारी चांगलाच मनस्ताप सहन करावा लागला. महामंडळाच्या ढिसाळ नियोजनामुळे पर्यटकांना चक्क एशियाड बसमधून प्रवास करावा लागता. मध्यवर्ती बसस्थानकात तब्बल दोन तास ताटकळल्यानंतर वेरुळला रवाना होण्याची नामुष्की पर्यटकांवर ओढवली.

जगप्रसिद्ध अजिंठा आणि वेरुळसाठी मध्यवर्ती बसस्थानकातून सुरू असलेल्या वातानुकूलित पर्यटन बसेस वारंवार पुण्याला पाठविण्याचा प्रकार होतो. प्रवाशांच्या गर्दीमुळे रविवारी शिवनेरी बसेस पुण्याला पाठविण्यात आल्या. या बसेस सोमवारी सकाळी येण्यास उशीर झाला. त्यामुळे 'एमटीडीसी'च्या कार्यालयात थांबलेल्या पर्यटकांसाठी थेट एस.टी.ची एशियाड बस पाठविण्यात आली.

वातानुकूलित बसची बुकिंग असताना एशियाड बस पाहून पर्यटक गोंधळून गेले. तेव्हा शिवनेरी बस उपलब्ध नसल्याची माहिती चालकाने दिली. तेव्हा संतप्त पर्यटकांनी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. यावेळी जायचे नसेल तर रिफंड घेऊन टाका, असे उत्तर मिळाल्याने पर्यटक संतप्त झाले.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. ॲझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.

आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521